## Quadrant II- Notes

**Programme : B.A.B.Ed.**

**Subject : Education**

**Paper Code : BSBAEDUM 07&08.**

**Paper Title : Methodology cum Content of Marathi**

**Unit : Unit/ □□□ □: □□□□□ □□□□□□□□□□**

**Module Name: 43. संविधान तक्ता / नील पत्रिका**

**Name of the Presenter: Mr.Sagar Machindra Davari.**

---

नील पत्रिका/ संविधान तक्ता :

इमारत तयार करण्यापूर्वी तिचा आराखडा तयार केला जातो. त्यानुसार इमारत बांधली जाते. या आराखड्याला खूप महत्व असते, तसेच घटक चाचणीपूर्वी जो आराखडा तयार केला जातो त्याला संविधान तक्ता म्हणतात. हा चाचणी तयार करण्यासाठी महत्त्वाचा ठरतो.

यामध्ये मूल्यमापनासाठी तीन अंगांचा विचार केलेला असतो. उद्दिष्ट, आशय आणि प्रश्नप्रकार महत्वांशाचा विचार केला जातो. या तीन मिती विचारात घेतलेल्या असतात म्हणून याला "त्रिमिती पत्रक" असेही म्हणतात.

उद्दिष्ट, आशय आणि प्रश्नप्रकार यांचे तीन तक्ते तयार केले जातात. त्यांचा नंतर एकत्रित तक्ता तयार केला जातो. या एकत्रित आराखड्यास "संविधान तक्ता" म्हणतात.

आपण पुढीलप्रमाणे त्यांचा अभ्यास करू,

- उद्दिष्टानुसार गुण विभागणी तक्ता:

या तक्त्यात घटकांसाठी उद्दिष्टानुसार गुण दिले जातात. त्यामुळे घटकातून कोणती उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य करायची तेही कळते.

| क्र. | उद्दिष्टे | गुण | शेकडा गुण (%) |
|---|---|---|---|
| १ | आठवणे (ज्ञान ) | ५ | २५ |
| २ | समजणे (आकलन ) | १२ | ६० |
| ३ | उपयोजन | ३ | १५ |
| | एकूण | २० | १०० |

- आशयानुसार गुणविभागणी तक्ता :

या तक्त्यामध्ये ज्या घटकांवर चाचणी घ्यायची आहे. त्यांची नोंद केली जाते, तसेच घटकांना गुणविभागणी कशी करायची ते ठरवले जाते.

| क्र. | घटक | गुण | शेकडा गुण (%) |
|---|---|---|---|
| १ | खो-खो | १२ | ६० |
| २ | घोडेमोडणी | ८ | ४० |
| | एकूण | २० | १०० |

- प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी तक्ता:

या तक्त्यात प्रश्नपत्रिकेत विचारायचे प्रश्न प्रकार असतात. प्रत्येक प्रकाराला किती गुण द्यायचे ते यावरून कळते.

| क्र. | प्रश्न प्रकार | गुण | शेकडा गुण (%) |
|---|---|---|---|
| १ | वस्तुनिष्ठ प्रश्न | ५ | २५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | लघुत्तरी प्रश्न – प्रकार १ | ३ | १५ |
| | प्रकार २ | ६ | ३० |
| ३ | दीर्घोत्तरी प्रश्न | ६ | ३० |
| | एकूण | २० | १०० |

- संविधान तक्ता :

या तक्ता एकत्रित तक्ता असतो. तिन्ही तक्ते एकत्रितपणे यात मांडले जातात.

| क्र. | उद्दिष्टे घटक | आठवणे | | | | समजणे | | | | उपयोजन | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | व | ल. | | दी | व. | ल. | | दी | व. | ल. | | दी | |
| | | | १ | २ | | | १ | २. | | | १. | २. | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | खो-खो | ३(३) | | | | | २(२) | २(४) | १(३) | | | | | ८(१२) |
| २. | घोडेमोडणी | २(२) | | | | | १(१) | १(२) | | | | | १(३) | ५(८) |
| | एकूण | ५(५) | | | | | ३(३) | ३(६) | १(३) | | | | १(३) | १३(२०) |

- सूची:

१. व: वस्तुनिष्ठ

२. ल: लघुत्तरी – १- प्रकार १

२- प्रकार २

३. दी: दीर्घोत्तरी

४. कंसातील अंक गुण दर्शवतात.

५. कंसाबाहेरील अंक प्रश्न संख्या दर्शवतात.

- **संविधान तक्ता महत्व:**

संविधान तक्ता हा शिक्षकांसाठी एक उपयुक्त साधन आहे. आपण त्याचे महत्व अभ्यासूया,

१. संविधान तक्ता तयार केल्यामुळे आशय, उद्दिष्टे, प्रश्न प्रकार यांना समान न्याय देता येतो.
२. संविधान तक्ता तयार असेल तर वेगवेगळ्या शिक्षकांनी त्यावर प्रश्नपत्रिका तयार केल्या तरी त्यात फारसा बदल होत नाही.
३. काठिण्य पातळी समान राखता येते.
४. प्रश्न पत्रिका तयार करणे सोपे होते.
५. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संविधान तक्ता गरजेचा आहे.

====================================================================